महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

epaper.shauryaMarathi.com वर्ष : - १ ले अंक :- ९४ शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ पान :- ४ किंमत ५ रु. जळगाव

## ‘सबका साथ, सबका विकास’ काँग्रेसला कधीच कळणार नाही; राज्यसभेतून पीएम मोदींचा हल्लाबोल

नवी दिल्ली- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज ५ वा दिवस आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा सुरू आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेनंतर आज राज्यसभेत धन्यवाद प्रस्तावावरील चर्चे ला उत्तर दिले. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसच्या मॉडेलमध्ये फक्त कुटुंबाला प्राधान्य दिले जाते. पण, आमच्या मॉडेलमध्ये देशाला प्राधान्य दिले जाते, अशी टीका पीएम मोदींनी केली.

सबका साथ, सबका विकास काँग्रेसला कधीच कळणार नाही

ओबीसी आयोगाच्या घटनात्मक दर्जाचा उल्लेख करत पीएम मोदी म्हणाले की, ओबीसींचा सन्मान आणि आदर आमच्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. देशात ज्या ज्या वेळी आरक्षणाचा मुद्दा आला, तेव्हा त्याला योग्य पद्धतीने सामोरे जाण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला नाही. आमच्या सरकारने पहिल्यांदाच सर्वसामान्य प्रवर्गातील गरिबांना १० टक्के आरक्षण दिले. हे कोणाकडूनही हिसकावून न घेता दिले. एससी-एसटी, ओबीसींनीही त्याचे स्वागत केले. संपूर्ण देशाने हे मान्य केले.आपल्या देशात दिव्यांगांचे कधीच ऐकून घेतले गेले नाही. पण,



आम्ही दिव्यांगांच्या आरक्षणाचा विस्तार केला, योजना तयार केल्या आणि अंमलातही आणल्या. आम्ही ट्रान्सजेंडर समुदायाच्या हक्कांबाबत प्रामाणिक प्रयत्न केले. सबका साथ, सबका विकास हा मंत्र आम्ही सत्यात उतरवून दाखवला. पण, काँग्रेसला याचा अर्थ कधीच समजणार नाही.

स्त्री शक्तीचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. त्यांना संधी मिळाली तर देशाच्या प्रगतीला अधिक गती मिळू शकेल. यासाठी आम्हीच नारी शक्ती वंदन कायदा आणला, असं मोदी म्हणाले. पीएम मोदी पुढे म्हणतात, २०१४ मध्ये आम्ही देशाला पर्यायी मॉडेल दिले. आम्ही समाधानाचे मॉडेल दिले आहे, तुष्टीकरणाचे नाही. निवडणुका आल्या की छोट्या वर्गाला काहीतरी द्यायचे आणि नंतर काहीच नाही, अशी काँग्रेसची पद्धत होती. फक्त मतांचे राजकारण करण्यावर त्यांचा भर होता. भारताकडे जे काही संसाधने आहेत, त्यांचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी आमचा प्रयत्न आहे. आपल्याजवळ जो काही वेळ आहे, तो वाया जाण्यापासून वाचवून प्रत्येक क्षणाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी केला पाहिजे. कोणतीही योजना असो, ती ज्यांच्यासाठी बनवली, त्याचा १०० टक्के लाभ मिळायला हवा. एससी-एसटी कायदा मजबूत करून आमच्या सरकारने दलित-आदिवासी समाजाप्रती आदर आणि बांधिलकी दाखवली. पण, काँग्रेसकडून आज जातीवादाचे विष पसरवण्याचे प्रयत्न केले जात आहेत, अशी टीकाही मोदींनी यावेळी केली.

भाविकांवर काळाचा घाला, टायर फुटल्याने कारची बसला धडक

## ‘महाकुंभ’ला जाताना भीषण अपघातात ८ ठार

प्रयागराज- प्रयागराजमधील कुंभमेळ्याला जाणार्या भाविकांवर दि. ६ फेब्रुवारी रोजी काळाने घाला घातला. जयपूरमधील मोखमपुराजवळ राष्ट्रीय महामार्ग ४८ वर झालेल्या भीषण अपघतात आठ भाविक जागीच ठार झाल्याचे समजते.



कारमधील भाविक प्रयागराजमधील कुंभमेळ्यासाठी जात होते. मोखमपुराजवळ राष्ट्रीय महामार्ग ४८ वर कारचे टायर फुटले.

चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकावरून कोसळून एका बसला धडकली. ही धडक एवढी भीषण होती की, कारमधील सर्व आठ भाविक जागीच ठार झाले.

## छत्रपती शिवाजी महाराजांवर शासकीय ग्रंथ प्रकाशित करावा; संभाजीराजेंची मागणी

मुंबई-माजी खासदार व स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात शासनाकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. या संदर्भातील पोस्ट त्यांनी दि. ६ फेब्रुवारी रोजी त्यांच्या अधिकृत एक्स (द) अकाऊंटवरून केली आहे.

संभाजीराजे छत्रपती यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, हल्ली कुणीही उठून आपापल्या आकलनानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मनाला वाटेल तसा सांगत आहे. इतिहासाची



प्रतारणा होईल, लोकभावनेस ठेच लागेल, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतील, याचे कुणालाही भान राहिलेले नाही. यावर ठोस उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या समग्र इतिहासावर परिपूर्ण शासकीय ग्रंथ प्रकाशित करावा, अशी मागणी त्यांनी राज्य सरकारकडे केली आहे. पुढे त्यांनी शासनाने शिवचरित्राचे संशोधक, अभ्यासक व चिकित्सक यांची संशोधन समिती स्थापन करून भक्कम संदर्भांवर आधारित शासकीय चरित्रग्रंथ प्रकाशित करावा, जेणेकरून शिवचरित्रावरील व्याख्याने, मालिका, नाटक, चित्रपट आदी सर्व साहित्यांस हा शासकीय चरित्रग्रंथ संदर्भ म्हणून वापरता येईल आणि इतिहासाविषयी वादंग उठणार नाही.

## उद्योजक, उद्योगांना त्रास देणाऱ्यांवर थेट ‘मोका’ लावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पोलिसांना सूचना

पिंपरी : आम्हाला ब्लॅकमेल केले जात आहे, त्रास दिला जात आहे, वसुली केली जात आहे, अशा तक्रारी उद्योग क्षेत्रातून, उद्योजकांकडून आमच्याकडे येत आहेत. मात्र, हे खपवून घेतले जाणार नाही. पोलिसांनीही खपवून घेऊ नये. उद्योजकांना त्रास देणारा महायुती किंवा इतर कोणत्याही पक्षाचे असूद्या, त्यांना सोडू नका. त्यांच्यावर थेट ‘मोका’ लावा. त्यांच्यावर ‘मोका’च्या खालची कारवाई करू नका, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना दिली.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय कार्यालयाच्या इमारतीचे गुरुवारी (दि. ६) जाधववाडी येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते भुमीपूजन झाले. यावेळी फडणवीस बोलत होते.

महाळुंगे ओद्योगिक पोलिस



संकुल, देहूरोड येथील पोलिस विश्रामगृह तसेच पुणे ग्रामीण पोलिसांच्या कार्यालयाच्या इमारतीचेही ऑनलाइन भुमीपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृहराज्य मंत्री योगेश कदम, आमदार अमित गोरखे, अण्णा बनसोडे, महेश लांडगे, शंकर जगताप, विजय शिवतारे, सुनील शेळके, शरद सोनवणे, बाबाजी काळे, बापू पठारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, पोलिस सह आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे, स्वप्ना गोरे, शिवाजी पवार उपस्थित होते.

## भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान मिराज २००० कोसळले, दोन्ही वैमानिक सुरक्षित; भयंकर अपघाताचा व्हिडिओ व्हायरल

नवी दिल्ली- भारतीय हवाई दलाशी संबंधित अपघाताची एक बातमी समोर येत आहे.

दि. ६ फेब्रुवारी रोजी मध्य प्रदेशातील शिवपुरी येथे भारतीय हवाई दलाचे मिराज २००० लढाऊ विमान कोसळले. या अपघातात लढाऊ विमानाचे दोन्ही वैमानिक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

अपघातानंतर लढाऊ विमानाने पेट घेतला असून, त्याचा व्हिडिओही समोर आला आहे. दरम्यान २०१९ मध्ये बालाकोट एअर स्ट्राइकसह अनेक ऑपरेशन्समध्ये मिराज-२००० लढाऊ विमानांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार,



गुरुवारी दुपारी २.२० वाजता हवाई दलाचे मिराज २००० लढाऊ विमान मध्य प्रदेशातील शिवपुरीच्या करायरा तालुक्यात कोसळले. संरक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार विमानाने नियमित प्रशिक्षण उड्डाण घेतल्यानंतर काही वेळाने ते कोसळले. अपघाताचे कारण शोधण्यासाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, अपघातग्रस्त मिराज २००० विमानाचे वैमानिक जखमी झाले आहेत पण ते सुरक्षित आहेत.

हे लढाऊ विमान ट्विन सीटर होते. विमान अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने तातडीने घटनास्थळी एक पथक पाठवले. दरम्यान, पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत.

विमान कोसळल्यानंतर ते पूर्णपणे जळून खाक झाले. त्याचा व्हिडिओही समोर आला आहे.

शिवपुरी जिल्ह्यातील बहरेता सानी गावाजवळील एका शेतात भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळल्यानंतर त्याला आग लागली. धूर दिसताच गावातील लोक घटनास्थळाकडे धावू लागले.

काही वेळातच गावकऱ्यांची गर्दी त्या ठिकाणी जमली. त्यांनी अपघातग्रस्त विमानाच्या वैमानिकांना बाजूला घेत त्यांना सावरले.

## धनंजय मुंडेंना दणका: कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात दोषी, करुणा मुंडेंना दरमहा २ लाख पोटगीचे आदेश

मुंबई- राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात दि. ६ फेब्रुवारी दोषी ठरवले. त्यांच्यावरील घरगुती हिंसाचार केल्याचा आरोप कोर्टाने मान्य करून करूणा मुंडे हीच त्यांची पहिली बायको असल्याचे मान्य केले आहे. करूणा यांना दरमहा २ लाख पोटगी देण्यात यावी, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे मुंडे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

करुणा मुंडे या फैमिली कोर्टात ४ फेब्रुवारी रोजी केस जिंकल्या त्याबद्दल एक स्त्री म्हणून त्यांचे अभिनंदन. मी वैयक्तिक विषयावर बोलत



नाही आणि ही वैयक्तिक टीका नाही. याची नोंद घ्यावी करुणा, धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहेत, त्यांना मारहाण झाली आहे आणि देखभाल खर्च देण्यात यावा आणि कुठल्याही प्रकारची दुखापत करण्यात येऊ नये, असे निर्देश आणि १,२५,००० रुपयाचा मासिक खर्च देण्यात यावा, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत, अशी एक्स पोस्ट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.

करुणा शर्मा यांनी २०२२ मध्ये घरगुती हिंसाचार कायद्याअंतर्गत धनंजय मुंडे यांच्याकडे पोटगीची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने पोटगी देण्याचा आदेश दिला आहे. न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध घरगुती हिंसाचाराचा कोणताही निष्कर्ष काढलेला नाही. आदेश केवळ आर्थिक विचारांवर आधारित असून अंतरिम भरपाई देण्याचे निर्देश देतो, कथित हिंसाचाराच्या कोणत्याही आरोपांवर नाही,असा खुलासा मुंडे यांचे वकील सायली सावंत यांनी केला आहे.

## भारतीयांच्या हकालपट्टीवरून प्रियंका गांधींची खोचक टीका

नवी दिल्ली - अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीयांना हद्दपार करण्याबाबत विरोधी नेत्यांमध्ये तीव्र चिंता आणि संताप आहे. या मुद्द्यावर, प्रियंका गांधी यांनी संसद भवनाबाहेर एक विशेष मुलाखत घेतली, ज्यामध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे अमेरिकन समकक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील संबंधांवर प्रश्न उपस्थित केले. प्रियांका गांधी म्हणाल्या, जर पंतप्रधान मोदी ट्रम्पचे इतके चांगले मित्र आहेत तर मग हे का होऊ दिले? यानंतर त्याने विचारले, आपले जहाज या भारतीयांना घेण्यासाठी का जाऊ शकले नाही?

प्रियांका गांधी पुढे म्हणाल्या की, मानवांना अशा प्रकारे वागवण्याची पद्धत नाही की त्यांना हातकड्या आणि बेड्या घालून पाठवले जाते. अशा अमानवी परिस्थितीसाठी परराष्ट्र



मंत्री आणि पंतप्रधानांनी उत्तर द्यावे.अमेरिकेतील हद्दपारीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी संसदेत गोंधळ घातला. सकाळी ११ वाजता संसदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर, विरोधी पक्षाच्या खासदारांनी या मुद्द्यावर त्वरित चर्चा करण्याची मागणी केली. यावेळी ‘सरकारला लाज वाटो’ अशा घोषणा देण्यात आल्या. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सरकारला या प्रकरणाची जाणीव आहे आणि हा परराष्ट्र धोरणाशी संबंधित मुद्दा आहे.

## लाडकी बहीण योजनेबाबत सरकारचा मोठा निर्णय शासन निर्णय जारी, प्रसिद्धीसाठी ३ कोटींचा निधी

मुंबई- महायुती सरकारने जाहीर केल्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चर्चेचा विषय ठरली आहे. ही योजना लागू केल्यापासून विरोधकांनी सातत्याने याबाबत टीका केली असून, विविध प्रकारचे दावे आताही केले जात आहेत. लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीमुळे अनेक योजना, अनुदान बंद करण्यात आल्याचा आरोप महायुती सरकारवर केला जात आहे. लाडकी बहीण योजनेचे कारण दाखवून शिवभोजन थाळी योजना बंद केली जाणार असल्याचा दावाही केला जात आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने एक महत्त्वाचा निर्मय घेतला असून, याबाबत शासन निर्णय जारी केल्याची माहिती मिळाली आहे.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी महत्त्वाची ठरली आहे. लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर महायुती सरकारने जुलै २०२४ पासून ही योजना लागू करत असल्याची घोषणा केली. यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारच्या विजयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली आहे. या योजनेला बळकटी देण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून मोठा निर्णय घेण्यात आल्याचे म्हटले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क विभागाने तयार केलेल्या सोशल मीडिया आणि डिजीटल मीडिया प्लॅनसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही मीडियावर प्रत्येकी दीड कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे राज्यातील पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात आतापर्यंत सात हप्त्यांची रक्कम जमा झाली आहे. म्हणजेच एका महिलेला १५०० रुपयांप्रमाणे १० हजार ५०० रुपये मिळाले आहेत. जानेवारी महिन्यात साधारणपणे २ कोटी ४१ लाख महिलांना सातव्या हप्त्याची रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी याआधी शासनाच्या कोणत्या योजनांचा लाभ घेतला आहे की नाही याची पडताळणी करण्यास सुरुवात केली आहे. यासाठी सरकारकडून परिवहन आणि आयकर विभागाची मदत घेतली जात आहे. यात छाननी प्रक्रियेत मुंबईतील २२ हजार महिलांना योजनेतून वगळण्यात आले आहे. त्यांना आता या योजनेचा लाभ मिळणार नाही अशी माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## धनंजय मुंडेसह श्रीकृष्ण पवारांचा ४१ कोटी भ्रष्टाचार; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा आरोप

मुंबई : कापूस साठवणुकीच्या पिशव्या खरेदीत महायुती सरकारकडून ४१ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलाय. बेकायदेशीररित्या निविदा काढल्या आहेत. तसेच एकाच परिवाराच्या चार कंपन्यांना काम देण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाची परवानगी न घेता आचारसंहितेत मंजूरी कशी दिली? असा सवालही नाना पटोलेंनी केला.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचे महाव्यवस्थापकीय संचालक (एमडी) तथा उप सचिव वस्त्रोद्योग श्रीकृष्ण पवार आणि तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडेंनी संगनमत करुन ५७७ रुपयांची पिशवी १२५० रुपयांना खरेदी करुन ४१ कोटी ५९ लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप नाना पटोलेंनी केलाय. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन श्रीकृष्ण पवार आणि धनंजय मुंडेंवर कारवाई करा अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.



तत्कालीन एकनाथ शिंदे-भाजपा सरकारमधील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग मंडळाच्या माध्यमातून कापूस साठवणूक बॅग खरेदीसाठी निविदा वेगळ्या शिर्षकाखाली काढून ७७ कोटी रुपयांची खिरापत वाटून ४१.५९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप नाना पटोलेंनी केला आहे. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

## संपादकीय

### किती काळ?

अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय, मणिपूर, मिझोराम या ईशान्येकडील राज्यांच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही अधिक आर्थिक आकारमान असलेल्या मुंबई महानगरपालिकेचा ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त आणि सध्याचे प्रशासक भूषण गगराणी यांनी सादर केला. मुंबई शहराच्या विकासासाठी गगराणी यांनी विविध उपाय सुचविले आहेत. सद्या:स्थितीत ते त्यांनाच सुचवावे लागणार. कारण महापालिका अस्तित्वातच नाही. मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांची कारकीर्द संपली त्यास पुढील महिन्यात तीन वर्षे पूर्ण होतील. हा काळ आणखी किती लांबणार ते कोणालाच ठाऊक असण्याची शक्यता नाही आणि तो कमी व्हावा यासाठी उत्सुकताही असण्याची अपेक्षा नाही. निवडणुका लगेचच होण्याची शक्यताही दिसत नाही. सबब स्थायी समिती, त्यातील टक्केवारी, प्रभागांमधील अगदी छोट्या कामांमधील नगरसेवकांची चिरीमिरी हे सध्या बंद आहे. गेली तीन वर्षे नगरसेवक नाहीत म्हणून सामान्य मुंबईकरांस चुकल्या-चुकल्यासारखे होत असेल असेही नाही. याचाच दुसरा अर्थ महापालिका प्रशासकाच्या ताब्यात आहे म्हणून सर्वसामान्य मुंबईकरांच्या जीवनमानावर काही परिणाम झाला, असेही काही नाही. असे असले तरीही लोकशाहीतील व्यवस्थेनुसार लोकप्रतिनिधींची राजवट लवकर येणे आवश्यक आहे. नकटी असली तरी हरकत नाही; पण सौंदर्यवती हुकूमशाहीपेक्षा तीच बरी. तथापि मुंबईकरांस- तसेच राज्यातील दोन डझनहून अधिक महापालिकांमध्ये आणि २०० हून अधिक नगरपालिकांत- पुन्हा एकदा लोकशाहीचे वारे खेळू लागणे नितांत गरजेचे आहे. लोकशाहीविषयी वरून अनास्था आणि खालून उदासीनता हे काही बरे नाही. कारण लोकशाही व्यवस्थेत कागदोपत्री का असेना पण कोणीतरी सामान्य जनतेस उत्तरदायी असतो. फिरोजशहा मेहता, बोमन बेहराम, ई. मोझेस, बी. एन. करंजिया, स. का. पाटील आदी एकापेक्षा एक धुरंधरांनी भूषवलेले मुंबई महापालिकेचे महापौरपद अधिक काळ रिक्त ठेवणे मुंबईकरांवर अन्याय करणारे आहे. असो. या पार्श्वभूमीवर या प्रचंड महापालिकेच्या तितक्याच प्रचंड अर्थसंकल्पाविषयी.

राज्य सरकारप्रमाणे मुंबई महापालिकेसमोरही लोकानुनयाचे गंभीर आव्हान उभे ठाकले आहे. आपल्याकडे निवडणुका म्हटले की मतांसाठी राजकारण्यांनी मतदारांना विविध प्रलोभने, सवलती देण्याची सर्रास परंपराच पडल्याचे दिसून येते. लाडकी बहीण, लाडका भाऊ, मोफत वीज अशा लोकप्रिय आणि हमखास मतांची हमी देणाऱ्या योजनांमुळे महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची अर्थव्यवस्था ढेपाळली. हीच गत मुंबई महानगरपालिकेची. जकात कर रद्द झाल्यापासून मुंबई महानगरपालिकेची आर्थिक स्थिती काहीशी लंगडीच झाली होती. जकातीपाठोपाठ मालमत्ता कर हे पालिकेला महसूल मिळवून देणारे साधन. पण मतांसाठी ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मालमत्तांना करात सवलत देण्यात आल्याने या श्रीमंत महापालिकेस मालमत्ता कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नावरही पाणी सोडावे लागल्याचे दिसते. तेव्हा महापालिकेचा हा एवढा मोठा गाडा चालणार कसा? तो हाकण्यासाठी पैसे आणणार कोठून? राज्याराज्यांच्या विक्री कराऐवजी 'वस्तू-सेवा कर' आकारणी सुरू झाल्याने राज्यांचे होणारे नुकसान जसे केंद्र सरकारने भरून देणे अपेक्षित आहे तशीच जकात बंद झाल्याने त्याची नुकसानभरपाई राज्य सरकारने देणे अपेक्षित आहे. त्यानुसार या अर्थसंकल्पात जकातीपोटी १४,३९८ कोटी रुपयांची नुकसानभरपाई यंदा अपेक्षित धरण्यात आली आहे. याचा सरळ अर्थ असा की आशियातील एकेकाळच्या सर्वात धनाढ्य वगैरे मुंबई महानगरपालिकेवरही अखेर शासनाच्या मदतीवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे मुंबईत सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इमारतींच्या बांधकामांमुळे पालिकेला आर्थिक फायदा झाला. बांधकामांसाठी विकासकांना पालिकेला भराव्या लागणाऱ्या रकमेमुळे चालू आर्थिक वर्षात विकास नियोजन विभागाकडून ५८०० कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित धरण्यात आला असता प्रत्यक्षात ८८०० कोटी मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पुढील वर्षी हा कर १० हजार कोटींच्या आसपास जाऊ शकतो, असा अंदाज आहे. तरीही पालिकेचा गाडा हाकण्यासाठी मुदत ठेवींना हात घालावा लागेल, असे सूतोवाच आयुक्तांनी केले आहे. मुदत ठेवींचा असा वापर करणे म्हणजे देशातील सर्वात श्रीमंत मुंबई महानगरपालिकेचा भव्य आणि मजबूत आर्थिक पाया डगमगू लागला असल्याचे लक्षण मानले जात असेल तर ते चुकीचे नाही.

महापालिकेकडे ८० हजार कोटी रुपयांपेक्षाही अधिक रकमेच्या मुदत ठेवी आहेत. पालिकेने हाती घेतलेले विविध प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मुदत ठेवींचा वापर करण्याची आवश्यकता आयुक्तांनी सूचित केली. अशी वेळ येणे धोकादायक. हे म्हणजे घर चालवण्यासाठी पूर्वजांनी पुढच्या पिढीसाठी ठेवलेले दागदागिने मोडून खाण्यासारखे. वास्तविक मुदत ठेवी व त्यातून मिळणारे व्याज ही मुंबई महानगरपालिकेची मोठी जमेची बाजू मानली जाते. पण 'पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा शहराच्या विकासासाठी खर्च करावे', असा उफराटा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच दोन वर्षांपूर्वी आपल्या मुंबई दौऱ्यात मुबंई महानगरपालिकेला दिला. तेव्हा खरे तर तो पालिका प्रशासनास मोठा धक्का होता. आता पंतप्रधानच पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा खर्च करा, असा सल्ला देऊ लागल्यास मागचा-पुढचा कसलाही विचार न करता योजनांची घोषणा करणाऱ्या सत्ताधीशांसमोर अधिकाऱ्यांचाही नाइलाज होतो.

## पत्नीने दारू पिण्यासाठी पैसे न दिलाचा राग आल्याने जन्मदात्या बापानेच दोघा मुलांना फेकले तापीत; थाळनेर येथील घटना

धुळे -शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथे काल सायंकाळी नात्याला काळीमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीने दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून हैवान झालेल्या बापाने आपल्या दोघा चिमुकल्यांना थेट तापी नदीत फेकून त्यांचा जीव घेतला.

या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी हैवान बापावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

याबाबत छायाबाई संजय कोळी (वय २९ रा. कुंभारटेक, थाळनेर ता. शिरपूर) यांनी थाळनेर पोलिसात फिर्यादी दिली आहे. त्यानुसार तिचा पती सुनिल नारायण कोळी (वय ३६) याला दारूचे व्यसन असून तो कुठलाही कामधंदा करत नसल्याने तो दारूसाठी पत्नीकडे पैशाची मागणी करीत तिच्याशी नेहमीच वाद घालत होता. काल दि. ४ रोजी दुपारी देखील त्याने पत्नी छायाबाईकडे दारू पिण्यासाठी पैशाची मागणी केली. मात्र तिने पैसे दिले नाही. त्या कारणावरून सुनिल कोळी याने सहा वर्षाचा मुलगा कार्तिक व तीन वर्षाची मुलगी चेतना या दोघा चिमुकल्यांना सोबत घेत थेट गावातील तापी नदी गाठली. दोघांना तापी नदीच्या पाण्यातील बेशरमच्या झाडात फेकुन दिले. त्यानंतर सुनिल कोळी या फरार झाला. दरम्यान पाण्यात बुडून दोघा चिमुकल्यांचा मृत्यू झाला.

सायंकाळी दोघांचे मृतदेह पाण्यात तरंगतांना दिसून आल्याने ग्रामस्थांनी पोहणाऱ्यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून दोघांना मृत घोषित केले. यावेळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. मुलांच्या मृत्यूचीबाब कळताच आई छायाबाई कोळी यांनी एकच आक्रोश केला. तसेच पती विरोधात थाळनेर पोलिसात फिर्याद दिली. त्यानुसार सुनिल कोळी यांच्याविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी त्याला आज सकाळी भाटपुरा परिसरातून अटक केली. तसेच दुपारी त्याला न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास सहय्यक पोलिस निरीक्षक शत्रुघ्न पाटील हे करीत आहेत.

## धुमस्टाईल चोरट्यांनी वृध्देची सोनसाखळी, पोत ओरबाडली

धुळे -शहरातील देवपूर भागात धुमस्टाईल चोरट्यांनी वृध्देच्या गळ्यातील सोनसाखळी आणि सोनपोत ओरबाडून नेली. याप्रकरणी देवपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवपूरातील म्युनसिपल कॉलनीतील प्लॉट क्र. ३८ मध्ये राहणाऱ्या अनुसया श्यामराव शिरसाठ (वय ६९) या काल दि. ४ रोजी रात्री सव्वाआठ वाजेच्या सुमारास देवपूरातील मनिकर्णिका भवनाच्या गेट समोरून जात होत्या. त्यादरम्यान तोंडाला काळा रूमाल बांधलेले दोन जण एका काळ्या रंगाच्या दुचाकीवर त्यांच्यावर आले. त्यांनी अचानक त्यांच्या गळ्यातील २५ हजार रूपये किंमतीची २० ग्रॅमची सोनसाखळी आणि १५ हजाराची ७ ग्रॅमची सोनपोत जबरीने खेचुन धुमस्टाईलने पसार झाले. याबाबत अनुसया शिरसाठ यांनी देवपूर पोलिसात फिर्यादी दिली. त्यानुसार दोघा अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल झाला.

## ४ लाख ४१ हजार रुपयाच्या विमल गुटखा जप्त करून आरोपीस पोलीसांनी केले जेरबंद

नवापूर-दि.५ फेब्रुवुरी गुजरात राज्याची बस क्रमांक बस (क्रमांक जी.जे.१८ झेड. टी०७०९) गोधरा-शिर्डी बसमध्ये अवैधरित्या गुटख्याची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखाला गुप्त माहिती मिळाली त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी नवापूर चेक पोस्ट जवळ दि.५ फेब्रुवारी रात्री ३ वाजेच्या सुमारास बस उभी करत तपासणी केली असता बसच्या लगेज डिक्कीमध्ये ४ लाख ४१ हजार रुपयाच्या विमल गुटखा मिळून आला.

लागलीच सदर बस नवापूर पोलीस स्टेशनला आणत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना बोलावून अवैध गुटखा तस्करी विरोधात कारवाई करत आरोपी रज्जाक अजीज लखनी रा. नवापूर याला ताब्यात घेतले असून नवापूर पोलीस



ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

या कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रावण दत्त व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

या कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार महेंद्र नगराळे, जितेंद्र तांबोळी, जितेंद्र तोरवणे, अन्न सुरक्षा अधीकारी आ.बा पवार यांनी केली. पुढील तपास नवापूर पोलीस करत आहे.

## बोराळा येथे नंदुरबार जिल्ह्यातील माजी सैनिकांचा सन्मान

शहादा -शहीद मिलिंद खैरनार यांची देशसेवा कायमस्वरूपी या पंचक्रोशीतील लोकांच्या स्मरणात राहावी यासाठी स्मारक उभे केले आहे तसेच या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना केल्याने देव, देश, धर्म असा असा त्रिवेणी संगम या ठिकाणी पंचक्रोशीतील नागरिकांना अनुभवायला मिळेल असे प्रतिपादन शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील यांनी केले.

बोराळा (ता. नंदुरबार) येथील शहीद मिलिंद खैरनार यांच्या स्मारकाला अभिवादन करुन नंदुरबार जिल्ह्यातील माजी



सैनिकांचा सन्मान करण्यात आला. दरम्यान बोराळा येथे

शहीद मिलिंद खैरनार यांचे स्मारक आहे. त्याच ठिकाणी शिवमंदिराची स्थापना करण्यात आली. प्रजासत्ताक दिनी सचिन जोशी व दत्ता पाठक या पुरोहितांकडून पूजाअर्चा, आरती करून शिवलिंगाची स्थापना केली. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते. शहीद मिलिंद खैरनार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शहाद्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार, शहादा बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील, प्रीती पाटील व बोराळा ग्रामस्थांनी जिल्ह्यातील सुमारे ५० माजी सैनिकांचा सन्मान केला तसेच शहीद मिलिंद खैरनार यांच्या वीरपत्नी हर्षदा खैरनार, वडील किशोर खैरनार यांचाही सन्मान करुन शहीद मिलिंद खैरनार यांच्या आठवणींना उजाळा दिला.

माजी सैनिकांचा सन्मान व त्यांच्या कार्याचा गौरव करणे हीपण एक देशसेवाच असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार यांनी सांगितले. यावेळी माजी सरपंच देविदास पाटील, उमाकांत पाटील यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन नरेंद्र गुरव यांनी केले.

## जिल्ह्यातील अंत्योदय व प्राधान्य कुटूंब योजनेतील लाभार्थ्यांनी ई-केवायसी करावी

### जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार यांनी केले आवहन

धुळे - जिल्ह्यातील अंत्योदय व प्राधान्य कुटूंब योजनेतील ज्या लाभार्थ्यांची ई केवायसी प्रलंबित आहे. अशा अंत्योदय व प्राधान्य कुटूंबातील सर्व लाभार्थ्यांनी २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत आपल्या रास्तभाव दुकानात जावून ई-केवायसी करावी. असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार यांनी केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानामार्फत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्यात येते. शासनाच्या निर्दे शानुसार जिल्ह्यातील अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील एकूण १४ लाख ९८ हजार ६९७ लाभार्थ्यांचे ई-केवायसी (लाभार्थी प्रमाणीकरण) करणे

बंधनकारक आहे. त्यापैकी ९ लाख ४४ हजार २३४ लाभार्थ्यांनी ई-केवायसी करून घेतली आहे. यात धुळे तीन लाख ६८ हजार ७९६ (६६.३५टक्के), साक्री दोन लाख ४२ हजार ६९८ (६३.६२ टक्के), शिरपूर एक लाख ७९ हजार २४७ (५६.३९ टक्के), शिंदखेडा एक लाख ५३ हजार ४९३ (६३.०३ टक्के) याप्रमाणे जिल्ह्यात एकूण ६३ टक्के लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यात आली आहे. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील शिधापत्रिकेसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांक बरोबर असल्याचे तसेच शिधापत्रिकेमध्ये नमुद व्यक्ती हयात आहेत किंवा नाही याची खात्री करण्यासाठी ई-केवायसी प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यात अद्याप पाच लाख ५४ हजार ४६३ लाभार्थ्यांची ई-केवायसी करणे प्रलंबित आहे. ई-केवायसी जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानामार्फत ई-पॉस मशीनद्वारे केली जात आहे.

सदर ई-केवायसी सुविधा रास्तभाव दुकानात लाभाथ्यर्थ्यांसाठी मोफत उपलब्ध आहे. अंत्योदय व प्राधान्य कुटूंब योजनेतील कुटूंबातील सर्व लाभार्थी यांची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्ह्यातील अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील ज्या लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. अश्या लाभार्थ्यांनी आपल्या रास्तभाव दुकानातून २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत ई-केवायसी करून घ्यावी.

तसेच आपली ई-केवायसी प्रक्रिया झाली आहे किंवा नाही याबाबत आपल्या रास्तभाव दुकानदाराकडून खात्री करून घ्यावी, असे आवाहनही जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

## नाशिक पालीवाल महिला मंडळातर्फे हळदी कुंकू व वाण वितरण कार्यक्रम संपन्न

नाशिक (प्रतिनिधी)-येथील पालीवाल महिला मंडळतर्फे सालाबादप्रमाणे मकरसंक्रांती निमित रथ सप्तमीच्या दिनी हळदी कुंकू व वाण वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक महिलांनी तसेच सासू आणि सुना व युवतींनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमात महिलांनी एकमेकांना वाण देऊन हळदी कुंकू लावून समूहगीत व भजन म्हटले. यानंतर सर्वांचा एकमेकांशी परिचय करण्यात आला. अल्पोपहार नंतर आभार व्यक्त करीत



कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी सौ.क्षमा पालीवाल, श्रीमती विजया पालीवाल, सौ. वंदना पालीवाल, सौ. किरण अनिल पालीवाल, सौ. मीना रमेश पालीवाल, सौ. मनीषा शांतीलाल पालीवाल, श्रीमती धुमाबाई पालीवाल, सौ. किरण राजेंद्र पालीवाल, सौ. ज्योती पालीवाल, सौ. स्नेहल पालीवाल, सौ.भारती सुधीर पालीवाल, सौ. भारती अरुण पालीवाल, सौ.गायत्री पालीवाल, सौ.कीर्ती पालीवाल, सौ. कोमल पालीवाल, सौ. शालिनी पालीवाल, सौ. जयश्री पालीवाल, सौ. सलोनी पालीवाल, सौ.ज्योती गणेश पालीवाल, सौ.मयुरी पालीवाल आदि महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.ज्योती दीपक पालीवाल, सौ.रश्मी गिरीश पालीवाल, सौ.नमिता तुषार पालीवाल आदींनी प्रयत्न केले.

## संजय पॉलिटेक्नीकचे प्राचार्य, चेअरमन यांचे दालन सील

धुळे - महापालिक न मालमत्ता कराच्या बड्या थकबाकीदारांविरोधात ठोर भुमिका घेतली असून संजय पॉलिटेक्नीकडे तब्बल २७लाखांची थकबाकी असल्याने आज जप्ती पथकाने थेट पॉलिटेक्नीमधील प्राचार्य आणि चेअरमन यांच्या दालनाला सील केले.

संजय एज्युकेशन संस्थेच्या भोकर येथील पॉलिटेक्नीक कॉलेजकडे २७ लाख ३२ हजार रूपयांची मालमत्ता कराची थकबाकी आहे.

त्यांना मनपाकडून थकबाकी भरण्याबाबत वेळोवेळी नोटीसा व जप्ती नोटीस देखील बजावण्यात आली होती.

परंतू तरीही संस्थेने कुठलाही प्रतिसाद दिला नाही.

त्यामुळे अखेर आज अतिरिक्ती आयुक्त करूणा डहाळे यांच्या नेतृत्वाखाली आज जप्ती पथकाने कॉलेजचे प्राचार्य आणि चेअरमन यांच्या दालनाला सील करण्याची कारवाई केली.

यावेळी वसुली अधिक्षक शिरीष जाधव, मधुकर निकुंभे, निरीक्षक पंकज शर्मा, के.जी. शेख, लिपीक रविंद्र पाटील, जयवंत पाटील, सुदर्शन देवरे उपस्थित होते.

## धुळे शहरातील देवपूर भागातील विटभट्टी परिसरात घरफोडी करणाऱ्या तिघा चोरट्यांना पोलिसांनी केले जेरबंद

धुळे -धुळे शहरातील देवपूर भागातील विटभट्टी परिसरात घरफोडी करणाऱ्या तिघा चोरट्यांना अवघ्या चोवीस तासात देवपूर पोलिसांनी गजाआड केले. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल देखील हस्तगत करण्यात आला.

देवपुरातील विटभट्टी परिसरातील मांगदेवबाबा मंदिर नजीक राहणाऱ्या मिराबाई नरहरी सोनार (वय ६४) या महिलेचे बंद घर दि.३ फेब्रुवारी रोजी रात्री चोरट्यांनी फोडले. बंद घराचा कडीकोयंडा तोडून घराच्या कपाटातील काचेच्या बरणीत ठेवलेली दहा हजार रुपयांची रोकड आणि सोन्याचे



दागिने असा एकूण ६१ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास झाला होता. देवपुर पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर पीआय धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्यातील संशयितांचा शोध पोलिस पथकाने सुरु केला. हरीष उर्फ सनी कैलास चौधरी (वय २४), हकुम रमेश चव्हाण (वय २४), कल्पेश यादव कानडे (वय २२) तिघे रा. विटभट्टी देवपुर धुळे यांना ताब्यात घेवून त्यांना पोलिसी खाक्या दाखविताच गुन्ह्याची कबुली त्यांनी दिली. या तिघा चोरट्यांनी मिराबाई सोनार यांच्याकडे केलेल्या घरफोडीसह दुसऱ्या घरफोडीचीही कबुली दिली आहे. चोरट्यांकडून इनव्हर्टर बॅटरी आणि काही मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, डीवायएसपी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय पाटील, असई मिलिंद सोनवणे, पोहेकॉ. दीपक विसपुते, महेंद्र भदाणे, ईश्वर पाटील, प्रविण पाटील, राहुल गुंजाळ, भटेंद्र पाटील, वसंत कोकणी, सोरभकुटे, नितीन चव्हाण यांच्या पथकाने केली.

तसेच एलसीबीचे निरीक्षक श्रीराम पवार, पोहेकॉ. मुकेश वाघ, श्रीकांत देवरे यांच्या पथकाने केली.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी** * **संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)

# ८ घरफोड्या उघड करून ५ जणांच्या आवळल्या मुसक्या

## जळगाव पोलीस दलाची कामगिरी, पावणे ९ लाखांचा मुद्देमाल जप्त

जळगाव (प्रतिनिधी) : येथील रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत्या घरफोड्यांच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी तब्बल ८ घरफोड्यांची उकल केली. यामध्ये ५ सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १० तोळे सोने, ६५० ग्रॅम चांदी आणि एलईडी टीव्ही असा एकूण ८ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या घटनेतील दोन चोरटे हे फरार झाले आहेत त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी बुधवारी दि. ५ फेब्रुवारी रोजी दिली.



जळगाव पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी शहरातील वाढत्या घरफोड्यांच्या गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि पोलीस उपअधीक्षक संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली रामानंद नगर पोलीस ठाण्याचे पथक सक्रिय झाले.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांना कळले की, संशयित सागर शिवराम डोईफोडे आणि त्याचे साथीदार हे महाबळ परिसरात झालेल्या घरफोड्यांमध्ये सामील आहेत. पोलिसांनी सागरला ताब्यात घेतले आणि चौकशी दरम्यान त्याने ६ घरफोड्यांची कबुली दिली.

सागर डोईफोडे आणि त्याच्या साथीदारांनी रात्रीच्या वेळी बंद घरे हेरून चोरी करण्याची रणनीती अवलंबली होती.

खिडक्या तोडून घरात प्रवेश करत आणि मौल्यवान वस्तू लंपास करत असत. या गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेल्या वस्तूंपैकी १० तोळे सोने आणि ६५० ग्रॅम चांदी हस्तगत करण्यात आली आहे.

सागर डोईफोडेच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नितेश मिलिंद जाधव, दीपक विनोद आढाळे, रवी भागवत सोनवणे आणि अनिल उर्फ मारी भगवान सोनवणे यांना अटक केली. या संशयित आरोपींनी दोन घरफोडीची कबुली दिली.

त्यांच्या ताब्यातून एलईडी टीव्ही आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यशस्वी कारवाईसाठी पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार संजय सपकाळे, पोलीस हवालदार जितेंद्र राजपूत, जितेंद्र राठोड, सुशील चौधरी, इरफान मलिक, पोलीस नाईक हेमंत कळसकर, रेवानंद साळुखे, विनोद सूर्यवंशी, पोलीस शिपाई रवींद्र चौधरी, उमेश पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोरुडे करत आहेत.

# ट्रक-बोलेरोच्या भीषण अपघातात तरूण ठार

जामनेर : तालुक्यातील माळपिंप्री गावाजवळ भरदार ट्रकने बोलेरो वाहनाला जोरदार धडक दिल्याने २५ वर्षीय तरुण जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी मंगळवारी दि. ४ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता जामनेर पोलीस ठाण्यात ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वप्निल श्रीराम गायकवाड (वय २५ रा. पाळधी ता.जामनेर) असे मयत चालकाचे नाव आहे. परिवारासह तो गावात राहत होता.

स्वप्निल गायकवाड हा २७ जानेवारी रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास बोलेरो पिकप क्रमांक (एमएच ०४ एचएस ६८६७) ने येत असताना समोरून येणारा ट्रक क्रमांक (एमएच ४८ जेझिरो ०१०५)



ने जोरदार धडक दिली. या धडकेत बोलेरो वाहनामधील चालक स्वप्निल गायकवाड हा जागीच ठार झाला, तसेच वाहनाचे मोठे नुकसान झाले. या संदर्भात जामनेर पोलीस ठाण्यात ट्रकवरील चालक सुनील हिरालाल सोनवणे (रा. खोटेनगर, जळगाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमळनेर शहरात ८ व ९ फेब्रुवारी रोजी जळगाव ग्रंथोत्सवाचे भव्य आयोजन !

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) - अमळनेर- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या अधिनस्त जळगाव येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, व अमळनेर येथील पुज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०८ व ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी 'ग्रंथोत्सव २०२४' चे आयोजन पू. साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालयाच्या टाऊन हॉलच्या भव्य पटांगणावर करण्यात आले आहे.

शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडी ह.भ.प.प.पू. श्री प्रसाद महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने व मुख्याधिकारी तुषार नेरकर व उपशिक्षणाधिकारी एफ. ए. पठान व गटशिक्षणाधिकारी रावसाहेब मांगो पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या शुभहस्ते दिंडीचे पूजन करण्यात येणार आहे.

यावेळी अनेक प्रकाशनाचे स्टॉल ग्रंथ विक्रीसाठी व प्रदर्शनासाठी दोन्ही दिवस असणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश सार्वांसाठी विनामूल्य आहे.

सकाळी ११ वाजता ग्रंथोत्सव व उद्घाटन समारंभ जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय राज्यमंत्री क्रीडा व युवक कल्याण विभाग रक्षाताई खडसे भुषवणार आहेत.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांच्यासह खासदार स्मिताताई वाघ तसेच जळगाव जिल्ह्यातील विधान परिषद व विधानसभा सदस्य तसेच जिल्हाधिकारी आयुष प्रसाद व ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात दुपारी ३ वाजता 'अहिराणी वैभव' डॉ. एस के पाटील (मालेगाव दाभाडी) यांचे प्रबोधनात्मक अहिराणी प्रवचन सायंकाळी ५ वा. मयूर देशमुख (नाशिक) यांचे त्यांच्या सहकाऱ्यांसह महाराष्ट्रातील थोर संतांच्या जीवनावरील संगीतमय भारुड या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दुसऱ्या दिवशी रविवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळच्या सत्रात प्राध्यापक महेंद्र गणपुले, नारायणगाव पूणे यांचा 'हास्यनगरी' या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दुपारच्या सत्रात 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या दिशेने ग्रंथालयाची वाटचाल' या विषयावर जळगाव येथील महाविद्यालयाचे ग्रंथपाल हितेश ब्रिजवासी यांचे व्याख्यान व त्यानंतर आदिवासी विकास आयुक्तालयाचे सहआयुक्त कपिल पवार यांचे व्याख्यान व साहित्यिक व दीर्घकाळ सेवा देणाऱ्या ग्रंथपालांचा सत्कार कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

तरी सर्व वाचक प्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहून या पर्वणीचा आनंद घ्यावा असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुहास रोकडे, व जिल्हा ग्रंथालय संघ, अमळनेर तालुका ग्रंथालय संघ, पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालयाचे दिलीप सोनवणे, चिटणीस प्रकाश वाघ यांनी केली आहे.

# हिवाळ्यातही वारंवार होतोय विजेचा लपंडाव

## महावितरण कंपनीच्या कारभारामुळे नागरिक त्रस्त

जळगाव : शहरातील अनेक भागात गेल्या दोन-तीन दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे दिवसा, रात्री-अपरात्री केव्हाही लाईट ये-जा करत असल्याने नागरिकांना वैताग आला आहे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच हिवाळ्यात महावितरणकडून विजेचा लंपडाव सुरू झाला असल्याचे नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

थंडीच्या दिवसात जळगावातील काही भागात गेल्या दोन दिवसांपासून उन्हाळ्यात ज्या पद्धतीने विजेचा लंपडाव होतो तसाच दिवसा, रात्री-अपरात्री केव्हाही होत आहे.

वीज वारंवार ये-जा करत असल्याने महिलावर्गाला याचा



जास्त त्रास होत आहे. ऐन सायंकाळी अंधार पडल्यावर लाईट जास्त वेळा जात असल्याने महिलांची धावपळ होत आहे.

महावितरणकडून काही सबस्टेशन अंतर्गत दुरुस्तीची कामे गेल्या दोन दिवसांपासून हाती घेण्यात आली आहे. यात डीपीवरील दुरुस्ती, वीजवाहिन्यांना जॉईंट मारणे, सर्व्हिस वायर बदलवणे आदी विद्युत लाइनवरील कामे महावितरणने हाती घेतली आहेत. गिरणा पंपिंग सबस्टेशन अंतर्गत वाघनगर, कोल्हे हिल्स परिसर, हुडको सबस्टेशन अंतर्गत हरिविठ्ठल नगर, आशाबाबा नगर, जय हनुमान नगर, श्याम नगर परिसरात वीज जाण्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. त्यात शहरातील अन्य भागात देखील वीज ये-जा करण्याचे प्रमाण वाढले आहे.

शहरातील वाढीव भागात असलेल्या डीपीवर वीज पुरवठ्याचे कनेक्शन वाढत आहे.

त्यामुळे डीपीवर लोड जास्त प्रमाणात होत असल्याने फेज जाण्याचे प्रमाण वाढले आहे. काही ठरावीक घरांचीच लाईट जात असल्याने ही समस्या सोडवावी अशी मागणी आहे.

# १० वी १२वींच्या परिक्षेदरम्यान नकारात्मक विचार किंवा परीक्षेची भिती घालवणार समुपदेशक

## राज्यमंडळाने जारी केले भ्रमणध्वनी क्रमांक

जळगाव (जिमाका वृत्तसेवा)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते दि. १८ मार्च २०२५ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते दि. १७ मार्च २०२५ या कालावधीत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात करण्यात आलेल्या आहेत.

परीक्षेच्या काळात अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात. अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन करण्याकरीता राज्यमंडळ स्तरावरुन समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

१) ९०११३०२९९७, २) ८२६३८७६८९६
३) ८७६७७५३०६९, ४) ७३८७४००९७०
५) ९९६०६४४४११, ६) ७२०८७७५११५
७) ८१६९२०२२१४, ८) ९८३४०८४५९३
९) ८३२९२३००२२, १०) ९५५२९८२११५

भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले समुपदेशक लेखी परीक्षेपूर्वी, परीक्षा कालावधीत सकाळी ८-०० ते रात्री ८-०० या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीव्दारे निशुल्क आवश्यक ते समुपदेशन करणार आहे. मात्र विद्यार्थी, पालक यांनी परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिकेसंबधित प्रश्न इत्यादींबाबत समुपदेशकांना विचारणा करू नये याची नोंद घ्यावी अशी माहिती डॉ. माधुरी सावरकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# कुटुंबाचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर सर्वेक्षण कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे जिल्हाधिकारींचे आवाहन

जळगाव (जिमाका वृत्तसेवा)- भारत सरकारच्या आधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबाचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणा-या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये फेब्रुवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ ह्या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणा-या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे. या पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

ही पाहणी जळगाव जिल्ह्यात होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय/दवाखान्यातून मिळणा-या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणा-या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि मागील '३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती' यामधून करण्यात येणार आहे. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे.

त्या अनुषंगाने माहिती संकलित करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना सखोल प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे दि. ०७ जानेवारी २०२५ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून क्षेत्रीय अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी फेब्रुवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ दरम्यान निवडलेल्या कुटुंबांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील माहिती गोळा करणार आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणी ८० वी फेरी अंतर्गत नमुना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

सर्वेक्षणाकरीता घरी येणा-या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्वाची माहिती समजून घेण्यासाठी आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे.

# जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी

## जळगाव जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्याबाबत सुचना जारी

जळगाव (जिमाका वृत्तसेवा)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते दि. १८ मार्च २०२५ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते दि. १७ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात करण्यात आलेल्या आहेत.

मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली इ. १२ वी व इ. १० वीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी महाराष्ट्र शासन व मंडळ प्रयत्नशील आहे.

यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली व प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरचित्र प्रणालीव्दारे बैठक घेण्यात आली. या दूरचित्र प्रणाली बैठकीमध्ये मुख्य सचिव यांनी यावर्षी होणाऱ्या इ. १२ वी व इ. १० वी परीक्षांच्या धर्तीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन



केले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल. राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येणआर आहे. परीक्षा सुरू होण्याच्या एक दिवस अगोदर परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री केली जाणार आहे. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार आहे. जिल्हयातील सर्व विभागाच्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधीत घटकांची फेशियल रेकग्निशन सिस्टम व्दारे तपासणी करण्यात येईल. तसेच विभागीय मंडळामार्फत परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना अधिकृत ओळखपत्र देण्यात येईल. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे. या सर्व उपाययोजना करण्यात येणार असून याची सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व परीक्षेशी संबंधित सर्व घटक यांनी नोंद घेण्याचे आवाहन सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी केले आहे.

# मोबाईलच्या अतिवापराने 'मोबाईल सिंड्रोम'मध्ये वाढ

जळगाव : तासनतास मोबाइलवर वेळ घालवण्याची सवय जवळपास अनेक तरुणांना जडली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कोरोना काळापासून त्यात मोठ्या प्रमाणावर भर पडली आहे. मुलांना ऑनलाइन अभ्यासामुळे त्यांच्याकडे दिवसभर मोबाइल राहत असल्याने 'मोबाईल सिंड्रोम' होण्याची शक्यता वाढली आहे.

या आजारामुळे हातापायाच्या हाडांतील लवचिकता नष्ट होत असते. त्यातच अनेक जण सोशल मीडियावर अधिक वेळ घालवत असल्याने त्यांच्या उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रत्येक जण मोबाइल, लॅपटॉपचा वापर करीत असतो. परंतु, सतत लॅपटॉपवर काम केल्यामुळे लॅपटॉप सिंड्रोम नावाचा आजार होऊ शकतो. यामुळे त्वचेला त्रास जाणवू शकतात.

४ वर्षांपासून मोबाईल व लॅपटॉपचा वापर वाढल्याने सिंड्रोममध्ये वाढ झाली. बोटांवर ताण पडतो. डोळे कोरडे पडणे, डोळ्यांची जळजळ वाढणे अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच अंगदुखीसह अंगठादुखीचे प्रमाण देखील वाढले असल्याचे अस्थिरोग तज्ज्ञांनी सांगितले. लॅपटॉप, मोबाइलचा गरजेपुरताच वापर करावा, मोबाइलवरून सतत टाईप करून मेसेज केल्यामुळे बोटे दुखण्याचे प्रमाण वाढले. त्याचबरोबर समाज माध्यमांवर विनाकारण रील्स यासह आदी मजकूर टाईप करण्यात वेळ घालवू नये.

# चौगाव किल्ला विकास निधीबाबत आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांची पर्यटन मंत्र्यांशी सकारात्मक चर्चा



चोपडा (प्रतिनिधी)- तालुक्यातील चौगाव किल्ला हा बाराव्या शतकातील अहिर राजांच्या काळात बांधला गेला. सत्तावीस एकर मधील समुद्र सपाटी पासून दोन हजार फुट व जमीनी पासून चारशे फुट उंच असलेला हा किल्ला भैरव घाटावर लक्ष ठेवण्यासाठी बांधण्यात आला.जळगाव जिल्ह्यातील सुस्थितीत असणारा हा एकमेव डोंगरी किल्ला आहे.

दोन प्रवेशद्वार, सप्ततलावांचा समुह,पाण्याच्या टाक्या (लेण्या), अनेक भुयारी मार्ग, पंचवीस फुट उंच भींती असलेला मोठा गवळी वाडा, तटबंदी, आई भवानीचे पडलेले मंदिर असे अनेक अवशेष आहेत.

बाजूला असलेला जिल्ह्यातील सर्वात उंच धबधबा तीन नाल्यांचा समुह व स.न.१९२६ साली स्वामी शांतानंद गौरी शंकर रामटेक वाले यांनी जिर्णोद्धार केलेले भगवान शंकर यांचे मंदिर व पंचमुखी हनुमान, नंदी व गणपती यांच्या मूर्ती आहेत. पण हा किल्ला महाराष्ट्र व मध्यप्रदेश सिमेलगत जंगलात अतिदुर्गम भागात असल्याने दुर्लक्षित राहिला

. पण मागील काही महिन्यापुर्वी चोपडा तालुक्याचे कार्यसम्राट आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रयत्नातून दहा कोटींचा निधी मंजूर झाला होता.पण विधानसभा निवडणुक आचारसंहिता लागल्यामुळे हा विषय प्रलंबित राहिला होता. पण आता पाच तारखेला आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांची भेट घेऊन चौगाव किल्ला विकासाठी भरीव निधी मिळावा.

याबाबत सकारात्मक चर्चा केली असून मंत्रीमहोदयांनी या बाबत सकारात्मकता दर्शविली आहे.

# ‘विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, नेतृत्वगुण व सर्जनशीलतेचा विकास व्हायला हवा’- अधिष्ठाता प्रा.डॉ.एस.एस.राजपूत




चोपडा (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे डॉ.सुरेश जी. पाटील महाविद्यालय,चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण मंत्रालय, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) अंतर्गत 'एक दिवसीय विद्यार्थी कौशल्य विकास कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून तसेच माजी शिक्षणमंत्री कै.शरच्चंद्रिका सुरेश पाटील व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.मा.डॉ.सुरेश जी.पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी तसेच कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा.डॉ. एस.एस.राजपूत व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अधिसभा सदस्य प्रा.डॉ.गजानन पांडुरंग पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य व विद्यार्थी कौशल्य विकास कार्यशाळेचे समन्वयक प्रा.डॉ.आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ.के.एन. सोनवणे, उपप्राचार्य डॉ.ए.बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. एस.ए.वाघ आदि उपस्थित होते.

या कार्यशाळेप्रसंगी विद्यापीठ परिक्षेत्रातील धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यातून एकूण १५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना महाविद्यालयाचे कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ.आर.एम.बागुल यांनी कार्यशाळा आयोजनामागील उद्देश व भूमिका स्पष्ट केली.

याप्रसंगी उदघाटनपर मनोगत व्यक्त करताना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा.डॉ.एस.एस.राजपूत म्हणाले की, तरुणांना रोजगारक्षम शिक्षण देऊन त्यांच्यातील आत्मविश्वास निर्माण करणे व नेतृत्व विकास करणे व सर्जनशीलतेचा विकसित करणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास या कार्यशाळेद्वारे साध्य झाला पाहिजे म्हणून सर्वसमावेशक शिक्षणावर भर दिला पाहिजे यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यात प्रामाणिकपणा व नीतिमत्ता टिकवून ठेवायला हवी, असे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी वेळेचे अचूक नियोजन, नितीमूल्यांची, प्रामाणिकपणा, नैतिकता, व्यवस्थापन, अचूक नियोजन या गोष्टींचा अवलंब जीवनात केला तरच सर्वांगीण विकास होईल.

रोजगार निर्मितीक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. गतकाळातील ज्ञान, विज्ञान, मूल्य यांचा परिचय विद्यार्थ्यांनी करून घ्यायला हवा'.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुनीता पाटील यांनी केले तर आभार प्रा. मयूर बी. पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व समिती प्रमुख व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपणार!

## यावल प्रकल्पातील सर्व शाळा ११ ते ५ भरणार




चोपडा(प्रतिनिधी)-गेल्या दीड वर्षापासून शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांची वेळ बदलण्यात आली होती.

गेल्या कार्यकाळातील आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांना आदिवासी विकास विभाग अनुदानित कर्मचारी संघटनेकडून शाळेची वेळ बदलावी यासाठी वेळोवेळी निवेदने देण्यात आले होती.

परंतु सरकार बदलले पण वेळ बदललेली नव्हती दरम्यान आताचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आपल्या पहिल्या जळगाव दौऱ्यातील दिलेले आश्वासन खरे ठरले आहे.

३ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे उपसचिव वि.फ. वसावे यांच्या सहीचे पत्र निर्गमित झाले असून, नाशिक विभागातील बऱ्याच प्रकल्प कार्यालयाने शाळेची वेळ बदलण्यासाठी कारवाई करणे सुरू केले आहे.

याच धर्तीवर यावल प्रकल्पातील सर्वच शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळा यादेखील अकरा ते पाच मध्ये भरतील अशा आशयाचे निवेदन या अगोदरच दिल्याने संबंधित शाळा देखील आता नवीन वेळापत्रकानुसार भरतील अशी माहिती आदिवासी विकास विभाग अनुदानित कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष राजेश पाटील व जिल्हाध्यक्ष मनोज ठाकरे यांनी दिली आहे.यामुळे शाळा तसेच अनुषंगिक बाबींसाठी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना अध्ययन अध्यापनासाठी निश्चित असा कालावधी आणि सोयीची वेळ यापुढे मिळणार आहे. व्यायाम, झोप,जेवण,खेळ,अध्ययन यासाठी विद्यार्थ्यांना नवीन वेळ मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले असून आश्रमशाळा शिक्षकांचा देखील वेळ बदलाचा प्रश्न निकाली निघाला आहे.या कामी पाठपुरवा करणाऱ्या अनेक लोकप्रतिनिधींचे देखील संघटनेकडून आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# पिंपळगाव खुर्द येथील अतिक्रमण काढण्याची ग्रामस्थांची मागणी

वरणगाव, ता. भुसावळ -तालुक्यातील पिंपळगाव खुर्द येथील गावांमध्ये अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले असून रस्ता मोकळा करून द्यावा यासाठी ग्रामस्थांनी शंभर सह्यांचे निवेदन पिंपळगाव सरपंच व ग्रामसेवक यांना दिले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपळगाव खुर्द गावात रस्त्यामध्ये पाण्याच्या टाक्या, वृंदावन, लोकांच्या घराच्या पायऱ्या व आता कॉलम सुद्धा रस्ता द्यायला लागले असून याचा लोकांना त्रास होत आहे. यामुळे अनेक भांडणे सुद्धा होत असून पोलीस स्टेशनमध्ये एनसीआरच्या पर्यंत नोंदी सुद्धा झालेल्या आहे. सरपंच व ग्रामसेवक यांनी याकडे जातीने लक्ष देऊन अतिक्रमण काढण्यासाठी प्रयत्न करावे, कारण गावातूनच पुढाऱ्यांचे अतिक्रमणासाठी वाव दिला जात असल्याचे दिसून येत आहे. गावात लग्नकार्य व कुठल्याही महापुरुषांच्या जयंतीच्या मिरवणुका काढणे सुद्धा कठीण झाले आहे. यामुळे पुढे महापुरुषांची जयंती होत असताना दंगली किंवा भांडणे होण्याची शक्यता आहे. हा रस्ता बारा फुटाचा असून काही ठिकाणी आठ फूट, सहा फूट, दहा फूट याप्रमाणे झालेला आहे. रस्त्याने बैलगाडी जाण्यास सुद्धा अडचण होत आहे.

बैल गाडीची वाहनाला किंवा पाण्याच्या टाकीला धक्का लागला तर वाद निर्माण होतात. तरी प्रशासनाने याबाबत त्वरित कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी जळगाव, वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे, गटविकास अधिकारी पंचायत समिती भुसावळ, मुख्याधिकारी जिल्हा परिषद जळगाव यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# मधमाश्यांच्या हल्ल्यात पुजाऱ्याचा मृत्यू इतर ५ जण जखमी

अमळनेर : -मधमाश्यांच्या हल्ल्यात एका पुजाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना ५ रोजी दुपारी साडे बारा वाजता जळोद येथे नदी काठावर घडली.यापूर्वी जवखेडा गावात देखील एका अंत्ययात्रेत मधमाश्यांच्या हल्ल्याची घटना घडली होती,त्यानंतर तालुक्यातील ही दुसरी घटना आहे.



तालुक्यातील जळोद येथे स्व डॉ काकासाहेब देशमुख यांच्या ११ व्याची पूजा होती. ही पूजा नदी काठावरच करावी म्हणून पुजारी अमोल शुक्ल वय ३८ रा पाठक गल्ली अमळनेर यांनी सांगितले होते. जळोद येथे नदी काठावर पुलाखाली स्व देशमुख यांच्या मुली व मुलांसोबत पूजा सुरू होती. पूजेत होम पेटवला असता धूर झाल्याने पुलाखाली असलेल्या मधमाशांच्या पोळे पर्यंत धूर पोहचल्याने मधमाशा भणकल्या. पूजेला बसलेल्याना चावल्या सर्व जण सैरावैरा पळू लागले. त्याचवेळी पुजारी अमोल शुक्ल यांनी सांगितले की पळू नका खाली झोपून घ्या त्या चावणार नाहीत. आपण पळालो तर त्या आपल्याला चावतील असे म्हणत ते खाली वाकले. सर्वात जास्त मधमाशा त्यांनाच तोंडाला चावल्या. आधीच त्यांना मधुमेह आणि रक्तदाबाचा त्रास होता. त्यामुळे जास्त त्रास होऊ लागला म्हणून उपचारासाठी त्यांना अमळनेर येथे आणत असताना रस्त्यात श्वास बंद पडून त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान इतर पाच ते सहा जणांना देखील मधमाशा चावल्याने त्यांचे अंग सुजले होते. त्यांना अमळगाव ग्रामीण रुग्णालयात आणून उपचार करण्यात आले.

# चोरट्याकडून १५ मोटारसायकल हस्तगत! एमआयडीसी पोलिसांची कामगिरी



जळगाव - शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटना लक्षात घेता एमआयडीसी पोलिसांनी एक दमदार कामगिरी केली आहे. शहरात दुचाकी चोरणाऱ्याला एकाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून १५ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटना घडत असून डॉ. रेड्डी यांनी आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते.

जळगाव जिल्ह्यात मोटार सायकल चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत यांनी चोरीच्या घटना उघडकीस आणून आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या पथकातील गुन्हे शोध पथकाने कार्यवाही सुरू केली होती.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार प्रदीप चौधरी यांना खबर मिळाली की, एक व्यक्ती एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरीची मोटार सायकल घेऊन फिरत आहे. त्यांनी ही माहिती पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना दिली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक राहुल तायडे, चंद्रकांत धनके, प्रदीप चौधरी, विकास सातदिवे, रतन गिते, राहुल घेते, योगेश बारी आणि योगेश घुगे यांच्या पथकाने त्या व्यक्तीला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने आपले नाव विक्की नंदलाल भालेराव (वय २८, रा. वाघ नगर, जळगाव) असे सांगितले. त्याने सागर पार्क येथून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

# महिंदळे परिसरातील हजारो हेक्टर शेती तहानलेलीच

भडगाव : शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेला जामदा डावा कालवा महिंदळे, पळासखेडे, रूपनगर, टिटवी गावापासून काही अंतरावर आहे.

परंतु, या कालव्याचा फायदा फक्त मोजक्याच शेतकऱ्यांना होत आहे. परिसरातील हजारो हेक्टर शेती आजही पाण्यावाचून आहे

'पाणी वाहतेय उशाला, कोरड मात्र शेतीला', अशी अवस्था परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्राची झाली आहे. परिसरातून सिंचनासाठी पाटचारी करून पाण्यावाचून कोरडा असलेल्या परिसराला 'सुजलाम सुफलाम' करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

परिसरातून जामदा डावा कालवा गेल्याने कालव्याच्या डाव्या बाजूचा परिसर हिरवळीने नटला आहे, परंतु महिंदळे, पळासखेडे, रूपनगर, टिटवी येथील शेतकऱ्यांची पूर्ण शेती कालव्याच्या उजव्या बाजूस असल्यामुळे डोळ्यासमोरून वाहून जाणाऱ्या पाण्याचा हजारो हेक्टर शेतीला फायदा नाही.

परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी विहिरीच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. विहिरींना कायमस्वरूपी पाणी राहण्यासाठी परिसरात एकही मोठे धरण किंवा नदी नाही. त्यामुळे विहिरी जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यातच तळ गाठतात.

त्यामुळे शेतकऱ्यांना एकाच पिकांवर अवलंबून राहावे लागते. ४ नालबंदी गावापासून जर कालव्याच्या उजव्या बाजूने पाटचारी काढण्याची मागणी होत आहे.

# टँकर पलटी झाल्याने गॅस गळती ; नागरिकांचे स्थलांतर;पारोळा येथे महामार्गावरील घटना




पारोळा ( प्रतिनिधी ) - पारोळा शहरातील बायपास हायवेवर मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास कॅप्सूल टँकर पलटी होऊन मोठ्या प्रमाणात गॅस गळती सुरू झाली आहे. गॅस गळती रोखण्यासाठी पोलीस प्रशासन, महसूल व जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. याबाबत आपत्ती व्यवस्थापनाला देखील कळवण्यात आलेले असून पोलीस निरीक्षक सुनील पवार, शहर तलाठी निशिकांत माने यांच्यासह पोलिस यंत्रणा मोठा फौजफाटा लावण्यात आला आहे.

हा ग्रीन लाईन कंपनीचा टँकर होता. त्यात लिक्विड नॅचरल गॅस साधारण १५ टन आहे. चालक सुभाषचंद्र सरोज (वय ३३, प्रतापगड, उत्तर प्रदेश) हा होता. परिसरात म्बुलन्स व अग्निशामकाचे वाहने देखील उपलब्ध ठेवण्यात आले आहे. गॅस गळतीमुळे परिसरातील नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून काहींचे स्थलांतर करण्यात येत आहे.

# रेल्वेमध्ये चोऱ्या करणाऱ्या नायडू गँगला अमळनेर पोलीसांनी केले जेरबंद



अमळनेर :- रेल्वेमध्ये चोऱ्या करणाऱ्या नायडू गँगला अटक करण्यात अमळनेरच्या रेल्वे पोलिसांना यश आले असून आरोपीना पकडून मध्यप्रदेश पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

४ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता मध्य रेल्वे च्या खंडवा ,भुसावळ आणि जळगाव आरपीएफ कडून मोबाईलवर अमळनेर एएसआय कुलभूषणसिंग चौहान याना माहिती मिळाली की खंडवा स्टेशनवर प्रवाश्यांचा सामान चोरी झाल्याची घटना घडली असून त्यात एक गँग सामील आहे आणि ते एका स्टेशनवरून दुसऱ्या स्टेशनवर कपडे बदलवून रूप बदलतात असे सीसीटीव्ही फुटेज देखील प्राप्त झाले. खंडवा स्टेशनवर एफआयआर दाखल झाली आहे.

नंतर हे सराईत गुन्हेगार भुसावळ उधना गाडी क्रमांक १९१०६ मध्ये रवाना झाल्याची माहिती वरिष्ठ निरीक्षक सत्यजित कुमार याना प्राप्त झाली. त्यांच्या मार्गदर्शनाने कुलभूषणसिंग यांनी अमळनेर चे कर्मचारी हेडकॉन्स्टेबल नंदू पाटील , अर्जुनसिंग याना अमळनेर स्टेशनवर मेमो गाडी आली असता गुन्हेगारांचा शोध घेण्यास सांगितले.

तीन चार डबे तपासल्यावर सामान्य कोच मध्ये चार संशयित व्यक्ती आढळून आले.

त्यांना पोलिसांनी घेराव घालून त्यांची उलट तपासणी सुरू केली. तिकीट आहे का यावरून त्यांना स्टेशनवर चौकशीला उतरवले. पोलिसांनी त्यांचा खाक्या दाखवताच त्यांनी त्यांची नावे अविनाश महारनन्ना नायडू वय २५ , अजय महारनन्ना नायडू वय २५ , काली कुन्नईया नायडू वय २९ तिघे रा वाकीपाडा मरीमाता मंदिर जवळ नवापूर महाराष्ट्र आणि राजा आरमबम वय ३३ रा अमरनगर एम आर ४ रोड उज्जैन मध्यप्रदेश असे सांगून त्यांनी नायडू गँग चे सदस्य असल्याचे सांगितले. या नायडू गँग मध्ये सात ते आठ सदस्य असून त्यांनी रेल्वे मध्ये तसेच विविध शहरात वेगवेगळ्या ठिकाणी चोऱ्या केल्याची कबुली दिली.

त्याच्याजवळून जप्त केलेल्या साहित्यात दोन लॅपटॉप , ६ मोबाईल , चार्जर , घड्याळ ,४६ हजार रुपये रोख असा एकूण २ लाख ८१ हजार रुपयांचे साहित्य तसेच दोन धारदार चाकू असे जप्त करण्यात येऊन आरोपीना वरिष्ठ निरीक्षकांकडे सोपवण्यात आले आहे. नायडू गँग चे सदस्य सापडल्याने मोठ्या चोऱ्या उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.